# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषी नगर, अकोला ४४४ १०४

वाचाः १) जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/ जाहिरात/२०१६ (०१), दि. १४ डिसेंबर, २०१६
२) जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/ जाहिरात/२०१६ (०२), दि. १४ डिसेंबर, २०१६
३) मा. उच्च न्यायालय नागपूर यांचे आदेश क्र ३०२८/२०१६ दि. ०७.०३.२०१७

## पदभरती संबंधी सुचना

क्र.पंदेकृवी/ जाहिरात/भप्र/२०१७ दिनांक ११ ऑक्टोबर २०१७

डॉ. पं.दे.कृ.वी. अकोला अंतर्गत विद्यापीठातील कृषी सहायक (पदवीका), कृषी सहायक (पदवीधर), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), वरिष्ठ लिपीक, लघुटंकलेखक, प्रयोगशाळा सहायक, निर्गम सहायक (ग्रंथालय), ग्रंथालय सहायक, कनिष्ठ तालिकाकार आणि सुरक्षा पर्यवेक्षक इत्यादी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी संदर्भीय १ व २ वर नमुद जाहिराती प्रसिध्द करण्यात आलेल्या असून त्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुषंगाने विद्यापीठास वरिल संवर्गांसाठी घेण्यात येणा-या लेखी परिक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जातील माहितीचे आधारे उमेदवारांच्या तात्पुरत्या स्वरुपाच्या पात्र व अपात्र यादया विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

तसेच जाहितीमध्ये कृषि सहायक (पदवीका) संवर्गात श्रवणशक्तीतील दोष या शारिरीकदृष्टया विकलांग प्रवर्गासाठी २ पदे नमुद आहेत. तथापी सन २०१५ मध्ये झालेल्या नियुक्ती प्रकरणासंबंधी सादर याचीकेस अनुसरुन मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने संदर्भीय ३ वर नमुद आदेश निर्गमीत केलेत. त्यामधील निर्देशानुसार विद्यापीठाव्दारे याचीकाकर्त्यांना श्रवणशक्तीतील दोष या शारिरीकदृष्टया विकलांग प्रवर्गातून नियुक्ती देण्यात आली असल्याने सदरच्या रिक्त पदसंख्येत बदल झाला आहे. त्यामुळे विद्यापीठ जाहिरातीमध्ये नमुद कृषि सहायक (पदवीका) संवर्गासाठी श्रवणशक्तीतील दोष या शारिरीकदृष्टया विकलांग प्रवर्गातून २ ऐवजी फक्त १ पद भरण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांना अपात्र यादी अथवा इतर संबंधी आक्षेप सादर करावयाचे झाल्यास त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरुपात निवेदन, सुचना प्रसिध्द झाल्याचे दिनांका पासून ते दिनांक ३०.१०.२०१७ रोजी सायंकाळी ०५.३० पर्यंत निम्न स्वाक्षरीत अधिका-यास पोहोचतील या बेताने सादर करावे. अंतिम तारखेनंतर प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची सुध्दा संबंधितांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

Mcert